**महाराष्ट्र शासन**

**वनविभाग**

**उप वनसंरक्षक पुणे वन विभाग पुणे**

**जाहिरात क्रमांक-1/2016** **दिनांक - 26/09/2016**

वन विभागातील पुणे वनवृत्तातील गट क मधील वनरक्षक या पदांसाठी पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन (Online) पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सूचना महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अख्त्यारीतील महाऑनलाईन या संस्थेच्या www.maharecruitment.mahaonline.gov.in व वन विभागाच्या www.mahaforest.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. विहित केलेले नमुना अर्ज संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अर्ज भरण्यापूर्वी उमेदवाराने संपूर्ण जाहिरात व आनुषंगिक सूचना काळजीपूर्वक वाचावी.

2.00 उपरोक्त संवर्गातील पदसंख्या, त्या पदाकरीता विहित केलेली वेतनश्रेणी / शैक्षणिक अर्हता/अनुभव /शारीरिक पात्रता /वयोमर्यादा इत्यादींचा तपशील खालील प्रमाणे आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्जाचे रजिस्ट्रेशन दि.19.10.2016 पर्यंत करता येईल. रजिस्ट्रेशन केलेले अर्ज अंतिमरित्या दि.21/10/2016 पर्यंत स्विकारले जातील.

**पदांचा तपशील :- वनरक्षक**

**अनुसूचित क्षेत्रामधील पदभरतीची पदे**

शासन अधिसूचना क्र. आरबीटीसी/ई-13013(4)/नोटीफिकेशन-1/474/2014, दि.09.06.2014, महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.बीसीसी-2014/प्र.क्र.213ए/14/16-ब, दि.31.07.2014 तसेच शासन अधिसूचना क्र.आरबी/टीसी/ई-13013(4)/नोटीफिकेशन-2/474/2014/730, दि.14.08.2014 अन्वये अनुसूचित क्षेत्रामधील वनरक्षक संवर्गातील रिक्त पदे ही स्थानिक अनुसूचित जमाती प्रवर्गामधून भरावयाचे आदेश प्राप्त झाले आहेत. त्यामध्ये पुणे जिल्हातील जून्नर व आंबेगाव तालुक्यातील अंशत: गावांचा समावेश असलेने जून्नर वनविभागातील जून्नर व आंबेगाव तालुक्यातील अनुसूचित क्षेत्रामधील वनरक्षक संवर्गाची रिक्त पदे ही स्थानिक जून्नर व आंबेगाव तालुक्यातील अनुसूचित क्षेत्रामधील अनुसूचित जमाती प्रवर्गामधून भरावयाची असलेने खालील प्रमाणे जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे सोबत गावांची यादी जोडण्यात येत आहे.

| अ.क्र. | वनविभाग | प्रवर्ग | महिला (33.33%) | सर्वसाधारण | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | जून्नर | अज | 2 | 3 | 5 |

**(* विशेष टिप - जाहिरातीत नमूद केलेली पदसंख्या दि.31.12.2016 अखेर रिक्त होणा-या पदावर आधारीत आहे. तसेच रिक्त पदांची प्रवर्ग निहाय व एकुण संख्या परिवर्तनीय असून त्यामध्ये वाढ किंवा घट होवू शकते.)**

पुणे जिल्हातील जून्नर व आंबेगाव या तालुक्यातील अनुसूचित क्षेत्रात समाविष्ट असलेल्या गावाची माहिती महाऑनलाईन या संस्थेच्या http://maharecruitment.mahaonline.gov.in व वनविभागाच्या www.mahaforest.gov.in. या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर अनुसूचित क्षेत्रातील अनुसूचित जमातीचे रिक्त पद भरताना उमेदवार विधी व न्याय मंत्रालयाचे असाधारण अधिसूचना दिनांक 2 डिसेंबर

Scanned by CamScanner

1985 भाग-2 खंड-3 उपखंड-1 क्रमांक 521 व सदर अधिसूचित क्षेत्रातील अनुसूचित जमातीचे रिक्त पदांसाठी अर्ज करताना उमेदवार त्या त्या पुणे जिल्हासाठी विधी व न्याय मंत्रालयाचे असाधारण अधिसूचना दिनांक 2 डिसेंबर 1985 मध्ये दिलेल्या गावाचे रहीवासी असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे त्यांनी स्वत: किंवा त्यांचे वडील / आजोबा दिनांक 26.01.1950 पासून आजतागायत सदर अनुसूचित क्षेत्रात सतत राहत असल्याचा सक्षम अधिका-यांचा सबळ पुरावा किंवा उमेदवाराचे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र किंवा अनुसूचित जमातीचे केलेला प्रमाणपत्रामध्ये अनुसूचित क्षेत्रातील रहिवासी असल्याबाबतचा उल्लेख असणे आवश्यक आहे अन्यथा असे उमेदवारांना अपात्र ठरविण्यात येईल. अर्ज भरण्यापूर्वी उमेदवाराने संपूर्ण जाहिरात व अनुषंगिक सूचना काळजीपूर्वक वाचावी.

**विशेष सूचना :- उपरोक्त प्रमाणे अनुसूचित क्षेत्रामधून निवड होऊन नियुक्त झालेल्या वनरक्षक यांना अनुसूचित क्षेत्रामध्ये नोकरी करणे बंधनकारक आहे.**

**अनुसूचित क्षेत्राबाहेरील पदभरतीची पदे**

| अ. क्र. | वन विभाग | प्रवर्ग | महिला (30%) | माजी सैनिक (15%) | प्रकल्प ग्रस्त (5%) | भूकंप ग्रस्त (2%) | खेळाडू (5%) | होमगार्ड (5%) | रोजंदारी वनमजूर (10%) | अंशकालीन उमेदवार (10%) | सर्वसाधारण | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पुणे | अजा | 1 | - | - | - | - | - | - | - | 1 | 2 |
| 2 | | भजब | - | - | - | - | - | - | - | - | 1 | 1 |
| 3 | | विमाप्र | - | - | - | - | - | - | - | - | 1 | 1 |
| 4 | | खुला | 1 | - | - | - | - | - | - | - | 2 | 3 |
| 5 | | एकूण | 2 | - | - | - | - | - | - | - | 5 | 7 |
| 6 | जुन्नर | अ.जा. | 1 | - | - | - | - | - | - | - | 1 | 2 |
| 7 | | भजक | - | - | - | - | - | - | - | - | 1 | 1 |
| 8 | | विमाप्र | - | - | - | - | - | - | - | - | 1 | 1 |
| 9 | | खुला | - | - | - | - | - | - | - | - | 1 | 1 |
| 10 | | एकूण | 1 | - | - | - | - | - | - | - | 4 | 5 |
| 11 | सोलापूर | अ.जा. | - | - | - | - | - | - | - | - | 1 | 1 |
| 14 | | अ.ज. | - | - | - | - | - | - | - | - | 1 | 1 |
| 15 | | एकूण | - | - | - | - | - | - | - | - | 2 | 2 |
| 16 | भोर | अ.जा. | - | - | - | - | - | - | - | - | 1 | 1 |
| 17 | | विजाअ | - | - | - | - | - | | | | 1 | 1 |
| 19 | | भ.ज.क | - | - | - | - | - | - | - | - | 1 | 1 |
| 20 | | इ.मा.व. | - | - | - | - | - | - | - | - | 1 | 1 |
| 21 | | खुला | 1 | - | - | - | - | - | - | - | 1 | 2 |
| 22 | | एकूण | 1 | - | - | - | - | - | - | - | 5 | 6 |
| 23 | पुणे वनवृत्त एकूण | | 4 | - | - | - | - | - | - | - | 16 | 20 |

**(* विशेष टिप - जाहिरातीत नमूद केलेली पदसंख्या-दि.31.12.2016 अखेर रिक्त होणा-या पदावर आधारीत आहे. तसेच रिक्त पदांची प्रवर्ग निहाय व एकुण संख्या परिवर्तनीय असून त्यामध्ये वाढ किंवा घट होवू शकते.)**

1. **वेतनश्रेणी :-** (रु .5200 - रु. 20200, ग्रेड पे - रु.1800 )

2. **शैक्षणिक पात्रता :-** ज्यांनी उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा विज्ञान किंवा गणित किंवा भुगोल किंवा अर्थशास्त्र या विषयासह उत्तीर्ण केलेली आहे.

शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र.एसएससी-2005/ (149/05)/उमाशि-2, दि.20/6/2005 अन्वये इ. 10 वी, 11 वी व 12 वी च्या परीक्षेशी समकक्ष परीक्षांची

Scanned by CamScanner

यादी प्रसिध्द करण्यात आलेली असून, सदर शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचे पत्र क्र.एसएससी-2010/(66/10)/ उमाशि-2, दि.29/4/2010 अन्वये सदर शासन निर्णयाचा विभागांना / कार्यालयांना वेळोवेळी उपयोग व्हावा या करीता तो महाराष्ट्र शासनाच्या www.mahaforest.gov.in या वेबसाईटरवर उपलब्ध करण्यात आला असून, त्यांचा संगणक संकेतांक क्रमांक 20100429170946001 असा आहे.

जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, अमरावती / नागपूर यांनी असे स्पष्ट केले आहे की, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.आरटीए-1082-2327-सीआर-63-16-अ, दि.5 ऑक्टोबर, 1989 नुसार एसएससी पास माजी सैनिकांना ज्यांची सैन्य सेवा 15 वर्ष झालेली आहे, त्यांना ज्या पदासाठी पदवी ही पात्रता आवश्यक आहे, त्या ठिकाणी ग्राह्य धरण्यात येते. वनविभागाव्दारे करण्यात येत असलेल्या वनरक्षकांच्या पदांच्या भरतीमध्ये ज्याकरीता 12 वी ही शैक्षणिक अर्हता आवश्यक आहे, त्याकरीता एसएससी पास आणि कमीत कमी 15 वर्ष सैन्य सेवा झालेल्या व ज्यांच्या जवळ सैन्यसेवेतील पदवी प्रमाणपत्र आहे, असे माजी सैनिकांना वनरक्षक पदासाठी पात्र ठरविण्यात यावे.

विविध शासकीय कार्यालयाव्दारे वेगवेगळया पदांच्या भरतीसाठी ज्याकरीता शैक्षणिक पात्रता ही 12 वी पास असते, त्याकरीता सैन्य सेवेतील पदवी ही ग्राहय धरण्यात येत असते. म्हणून जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांचेव्दारे दिलेल्या खुलाशानुसार अटी व शर्ती पुर्ण करणारे माजी सैनिकांना माजी सैनिक या समांतर आरक्षणाचे पदाकरीता अन्य आवश्यक अटी व शर्तीचे अधिन राहून शैक्षणिक पात्रतेच्या दृष्टिने पात्र ठरविण्यात यावे. शासन पत्र क्रमांक एफएसटी-11/13/प्र.क्र.618/फ-4,दिनांक 6 मार्च 2014 अन्वये माजी सैनिकांसाठी वनरक्षक पदासाठी फक्त इयत्ता दहावीचे गुणविचारात घेवून निवड याद्या तयार करण्यात येतील.

**शासनाने वेळोवेळी घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागात वास्तव्य असलेल्या उमेदवारांना आणि सर्व अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांना खालील नमूद केलेल्या शैक्षणिक पात्रतेमध्ये सुट देण्यात येईल.-**

एक) शैक्षणिक पात्रता- अनुसुचित जमाती प्रवर्गातील उमेदवार आणि नक्षलवाद्यांच्या हल्यात मरण पावलेले किंवा गंभीररित्या जखमी झालेले वनखबरे व वनकर्मचा-यांच्या मुलांनी माध्यमिक शालांत परीक्षा उत्तिर्ण केली असल्यास (इयत्ता 10 वी) या पदासाठी पात्र ठरविण्यात येईल.

टिप :- नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात मरण पावलेले किंवा गंभीररित्या जखमी झालेले वनखबरे व वनकर्मचा-यांचे संबंधात वरील प्रयोजनाकरीता शासकीय वैद्यकीय अधिकारी आणि पोलीस खात्यातील घटनेच्या कार्यक्षेत्रातील सक्षम पोलीस अधिकारी यांचेकडुन निर्गमीत केलेले प्रमाणपत्र विचारार्थ घेण्यात यावे.

3.0 वयोमर्यादा :- उमेदवाराचे वय दिनांक 26 सप्टेंबर 2016 रोजी किमान 18 वर्षापेक्षा कमी व कमाल 25 वर्षापेक्षा जास्त नसावे म्हणजेच उमेदवाराचा जन्म हा दिनांक 26 सप्टेंबर 1998 नंतरचा नसावा व उमेदवाराचा जन्म दिनांक 26 सप्टेंबर 1991 पूर्वीचा नसावा.

**3.1 उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम.**

(एक) महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवाराच्या बाबतीत 5 वर्षापर्यंत.

Scanned by CamScanner

**(दोन)** महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शुध्दीपत्रक क्र.मासैक-10-10/प्र.क्र.279/10/16-अ, दि.20 ऑगष्ट, 2010 अन्वये "माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील वर्ग-3 व वर्ग-4 मधील पदांसाठी नेमणुकीकरीता विहित वयोमर्यादेतील सुट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक 3 वर्षे इतकी राहील."

**(तीन)** पात्र खेळाडूच्या बाबतीत 5 वर्षापर्यंत, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय, क्रमांक राक्रीधो. 2002/प्र.क्र.68/क्रीयुसे-2, दिनांक 30 एप्रिल 2005 अन्वये खेळाडूची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन सदर पदासाठी असलेल्या वयोमर्यादेत 5 वर्षापर्यंत वयाची अट शिशिल करण्यात येईल.

**(चार)** प्रकल्प ग्रस्त व भूकंपग्रस्त उमेदवारांच्या बाबतीत खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरीता तसेच मागासवर्गीय उमेदवारांकरती सरसकट कमाल वयोमर्यादा 45 वर्षे राहील. सुशिक्षित बेरोजगार व अंशकालीन उमेदवारांकरीतासरसकट कमाल वयोमर्यादा 46 वर्षे राहील.

**(पाच)** वनविभागातील अधिसंख्य वनमजूरांना महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग, शासन निर्णय क्र. बैठक-2010/प्र.क्र.7/फ-9, दिनांक 16 ऑक्टोबर, 2012 अन्वये वयाच्या 33 वर्षानंतर (संबंधित( मजूर जेवढी वर्षे वन विभागात कार्यरत आहेत तेवढया वर्षानी वयाची अट शिथील करण्यात येईल.

**(सहा)** महसूल व वनविभाग मंत्रालय मुंबई शासन निर्णय क्र.बैठक-2010/प्र.क्र.7/फ- 9, दि.16.10.2012 नुसार रोजंदारी वनमजूरांना 10 % समांतर आरक्षण व अंशकालीन उमेदवारांना अनुज्ञेय असलेली वयाच्या संदर्भात असलेली सूट (46 वर्षे) अनुज्ञेय राहील.

**4.0 वनरक्षक पदासाठी शारीरिक पात्रता.**

| शारीरीक माप | उमेदवाराचा प्रवर्ग | |
|---|---|---|
| | पुरुष | स्त्री |
| उंची (से.मी. मध्ये ) | 163 | 150 |
| छातीचा घेर -<br>न फुगवता (से.मी. मध्ये )<br>फुगवून (से.मी. मध्ये) | <br>79<br>84 | <br>--<br>-- |
| वजन (कि.ग्र.मध्ये) | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात |
| (अनुसूचित जमाती मधील उमेदवारासाठी खालील प्रमाणे शिथिलक्षम) | | |
| उंची (से.मी. मध्ये) | 152.5 | 145 |
| छातीचा घेर --<br>न फुगवता (से.मी. मध्ये )<br>फुगवून (से.मी. मध्ये) | <br>79<br>84 | <br>--<br>-- |
| वजन (कि.ग्र.मध्ये) | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात |

**(चार)** **दूरदृष्टी** आणि जवळील दृष्टीचे चष्मे व विना चष्म्याचे खालील मानक पूर्ण करताल.

**दूरदृष्टी**

| अधिक चांगला डोळा | वाईट डोळा |
|---|---|
| (सुधारलेली दृष्टी) | |
| 6/6 | 6/12 |
| किंवा | किंवा |

Scanned by CamScanner

6/9 6/9

**जवळील दृष्टी**

अधिक चांगला डोळा वाईट डोळा

J.1 J.11

प्रत्येक डोळा संपूर्ण क्षेत्र दृष्टीयुक्त असणे आवश्यक आहे.

(ब) शासकीय वैद्यकीय अधिकारी किंवा वैद्यकीय तपासणी संदर्भात प्राधिकृत केलेल्या वैद्यकीय विशेषज्ञांकडून वैद्यकीय पात्रता प्रमाणित करण्यात येईल. वैद्यकीय चाचणीमध्ये तिरळेपणा,रंग व रात आंधळेपणा, आतल्या बाजूला फेंगाडे असलेले गुडघे, सपाट पाय, त्वचा व छातीचे रोग या संबंधीचा आणि अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मानव संसाधन व्यवस्थापन व प्रशासन) यांनी वेळोवेळी विहित केलेल्या अन्य वैद्यकीय चाचणीचा समावेश राहील.

(क) शासनाने वेळोवेळी घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागात वास्तव्य असलेल्या उमेदवारांना खाली नमूद केल्याप्रमाणे शारिरीक पात्रतेमध्ये सुट देण्यात येईल. नक्षलवाद्यांच्या हल्यात मरण पावलेल्या किंवा गंभीररित्या जखमी झालेल्या वनखबरे व वनकर्मचा-यांचे मुलांना खाली नमूद केल्याप्रमाणे सुट देण्यात येईल.

1) **उंची** :- पुरूष आणि स्त्री उमेदवारासाठी 2.5 से.मी.

2) **छाती** :- मोजणी आवश्यक नाही.

(ड) **खेळाडू प्रवर्ग :-** विहित शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या व वयोमर्यादेची अट पूर्ण करणाऱ्या खेळाडूंना, विहित उंचीमध्ये 2.5 से.मी. इतकी सवलत देण्यात येईल.

(इ) **वनकर्मचा-यांचे पाल्यांना शारीरिक अर्हतेत सवलत:-** सेवेत कार्यरत असतांना मृत्यू पावलेल्या वनकर्मचा-यांच्या एका मुलास किंवा मुलीस शारीरिक पात्रतेत खालील प्रमाणे सवलत देण्यात येईल.

(ए) **उंची** :- पुरूष आणि स्त्री उमेदवारास 2.5 से.मी.

(बी) **छाती** :- पुरुष उमेदवारांना 2.0 से.मी. न फुगवता व 1.5 से.मी. फुगवून.

(फ) **किमान सापेक्ष ऊंची, वजन व छातीची मोपमापे :-**

शासन पत्र क्रमांक एफएसटी-07/11/प्र.क्र.287/फ-4, दि.24/8/2011
उपरोक्त शासन पत्रातील निर्देशानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम-1981 मधील परिशिष्ट-3 मध्ये महाराष्ट्र वनसेवेतंर्गत निवड करण्यात आलेल्या उमेदवारांसाठी विहित केलेल्या ऊंची व वजनाच्या तक्त्याप्रमाणे वनरक्षक या पदासाठीही उंचीच्या प्रमाणात वजन आवश्यक राहील. वैद्यकीय तपासणी करणा-या व्यक्तींच्या मार्गदर्शनाकरीता सर्वसाधारण नियमानुसार पुरेशी मानली जाणारी किमान सापेक्ष उंची, वजन व छातीची मोजमापे दर्शविणारा तक्ता नमूद आहे. त्याप्रमाणे कार्यवाही होईल.

5.00 **निवडीची पध्दत :-**

5.1 उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा व त्याची पुणे व सोलापूर जिल्ह्यातील

Scanned by CamScanner

आदिवासी दुर्गम भागात काम करण्याची तयारी असावी.

5.2 वनरक्षक पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवार किमान शारिरीक पात्रता धारण करतात किंवा कसे, हे निश्चित करण्याच्या दृष्टीने उमेदवारांची मोजमापे स्थानिक शासकीय वैद्यकीय अधिकारी यांच्या उपस्थितीत घेण्यात येतील

5.3 जे उमेदवार किमान शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादेची अट तसेच किमान शारीरिक पात्रता धारण करतात, त्या पात्र उमेदवारांची खालीलप्रमाणे शारीरिक क्षमता चाचणी घेण्यात येईल.

बहुतांश वनक्षेत्र हे भौगोलिकदृष्ट्या दुर्गम क्षेत्रात अस्तित्वात आहे. वनरक्षक हे वन विभागातील क्षेत्रिय स्तरावरील आघाडीवरील पद (Frontline Staff) असून, वनरक्षकाने वनसंरक्षणाच्या दृष्टीने वनक्षेत्रात पायी फिरुन गस्त घालणे आवश्यक असते.त्यामुळे वनरक्षक या पदासाठी 4 तासामध्ये पुरुष उमेदवारांना 25 कि.मी. चालणे व महिला उमेदवारांना 16 कि.मी. चालणे अशी शारिरिक क्षमता चाचणी विहित करण्यात येत आहे.

शारीरिकदृष्ट्या सक्षम उमेदवारांची प्राधान्याने निवड करण्याच्या दृष्टीने विहित केलेल्या शारीरिक मोजमापाप्रमाणे व शारीरिकदृष्ट्या सुदृढ असल्याबाबत वैद्यकीय प्रमाणपत्र धारण करणा-या पात्र ठरलेल्या उमेदवारांची प्रथम शारीरिक क्षमता चाळणी चाचणी घेण्यात येईल. ही चाळणी चाचणी स्पर्धात्मक स्वरुपाची व बाद पध्दतीची असेल. यामध्ये प्रथम येणारे पदसंख्येच्या 3 पट ऐवढे उमेदवार पुढील फेरीसाठी पात्र ठरविण्यात येतील. उमेदवारांची संख्या निश्चित करताना विहित करण्यात आलेले आरक्षणही विचारात घेण्यात येईल.

सदर धावण्याची चाळणी चाचणी पुरुष उमेदवारांनी 5 कि.मी. व महिला उमेदवारांनी 3 कि.मी. जास्तीत जास्त 30 मिनीटांमध्ये पूर्ण करणे आवश्यक राहील. धावण्याची चाचणी परीक्षासाठी 12.5 टक्के इतके भारांकन (Weightage) देण्यात येईल. यासाठी शारीरिक दृष्टया सुदृढ असल्याबाबत शासकिय वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून विहित प्रपत्रात प्रमाणपत्र प्राप्त करावे. त्याशिवाय शारीरिक तपासणी करीता पात्र ठरविण्यात येणार नाही. सदरचे ओळखपत्र www.maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावरुन दोन प्रतीत डाऊनलोड करावे व एक प्रत शारीरिक मोजमाप तपासणीचे वेळेस सादर करावी.

5.4 (i) वरील प्रमाणे पुढील फेरीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचे उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा विज्ञान किंवा गणित किंवा भुगोल किंवा अर्थशास्त्र या विषयासह व

(ii) अनुसुचित जमाती प्रवर्गातील उमेदवार आणि नक्षलवाद्यांच्या हल्यात मरण पावलेले किंवा गंभीररित्या जखमी झालेले वनखबरे व वनकर्मचा-यांच्या मुलांसाठी तसेच माजी सैनिक यांचेसाठी 10 मधील (माध्यमिक शालांत परीक्षा) एकुण गुण विचारात घेवून गुणानुक्रम निश्चित करण्यात येईल. इ. 10 वी मधील गुणांना 87.5 % इतके भारांकन (Weightage) देण्यात येईल.

5.5 वरीलप्रमाणे इ.10 वी /12 वी मधील गुण (87.5%) व धावण्याची चाचणी परीक्षामधील गुण (12.5%) एकत्रित करुन त्यानुसार निवड यादी तयार करण्यात येईल.धावण्याच्या चाचणीमध्ये शासन पत्र एफएसटी 07/ 11/ प्र.क्र. 287/ फ-4, महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई दि.21/7/2014 अन्वये खालील प्रमाणे गुण देणेत येतील.

Scanned by CamScanner

1) पहिल्या येणा-या 3 उमेदवारास ( क्र 1 ते 3 वरील आलेले) यांना प्रत्येकी 10 गुण
2) त्यांनतर येणा-या 5 उमेदवारास ( क्र 4 ते 8 वरील आलेले ) यांना प्रत्येकी 8 गुण
3) त्यांनतर येणा-या 7 उमेदवारास ( क्र 9 ते 15 वरील आलेले )यांना प्रत्येकी 6 गुण
4) त्यांनतर येणा-या 10 उमेदवारास ( क्र 16 ते 25 वरील आलेले) यांना प्रत्येकी 4 गुण
5) त्यांनतर येणा-या 15 उमेदवारास ( क्र 26 ते 40 वरील आलेले) यांना प्रत्येकी 2.5 गुण.

अ.क्र. 40 नंतर येणाया- उमेदवारास कोणतेही गुण मिळणार नाही.

**5.6** निवडयादी तयार करण्यापूर्वी शासन निर्णय क्रमांक एफएसटी-07/11/ प्र.क्र.287/फ-4, दि.30 जुलै, 2011 अन्वये 25 कि.मी. पुरुष उमेदवारांसाठी तर 16 कि.मी. चालणे स्त्री उमेदवारांसाठी चालण्याची शारीरिक चाचणी घेण्यात येईल. उपरोक्त चाचणी ही चार तासांमध्ये पूर्ण करणे बंधनकारक राहील.

**6.00 निवड प्रक्रियेचे वेळापत्रक :-**

| अ.क्र. | टप्पा | दिनांक |
|---|---|---|
| 1 | 2 | 3 |
| 1 | विविध माध्यमातून प्रसिध्दी देऊन ऑनलाईन अर्ज मागविणे. वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करण्याची अंतिम तारीख. (निवड समित्यांनी वृत्तपत्रकीय जाहिरातीव्दारे तसेच स्थानीक रोजगार व्यवसाय मार्गदर्शन केंद्रामार्फत व्यापक पुर्वप्रसिध्दी करीता संबंधितांना कळविणे ) | 26/09/2016 |
| 2 | ऑनलाईन अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख | 19/10/2016 |
| 3 | प्राप्त ऑनलाईन अर्जानुसार उमेदवारांची शारीरिक पात्रता तपासणीचा कार्यक्रम व 5 कि. मी./3 कि. मी. धावण्याची चाळणी चाचणीचा कार्यक्रम प्रसिध्द करणे | 03/11/2016 |
| 4 | उमेदवारांची शारीरिक पात्रता तपासणे. (उंची, छातीचे माप व वजन) | 05/11/2016 ते 08/11/2016 |
| 5 | शारीरिक अर्हतामध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांची 5 कि.मी./3 कि.मी. धावण्याची चाळणी चाचणी घेणे. | |
| 6 | 5 कि.मी./3 कि.मी. धावण्याची चाळनी मध्ये नियमानुसार 1:3 प्रमाणात पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी तसेच प्रमाणपत्र तपासणी कार्यक्रम प्रसिध्द करणे. | 19/11/2016 |
| 7 | धावण्याची चाळणी चाचणी मध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांची शैक्षणिक व इतर अर्हता बाबत प्रमाणपत्र तपासणी करणे. | 22/11/2016 ते 25/11/2016 |
| 8 | उमेदवारांची शैक्षणिक अर्हता परिक्षेमध्ये प्राप्त गुणांचे 87.5 % भारांकन + शासन पत्र दिनांक 21/07/2014 अन्वये 5 कि.मी./3 कि.मी. धावण्याच्या चाचणीमध्ये मिळालेल्या गुणांची बेरीज करुन निवड यादी तयार करुन जाहिर करणे (25 कि.मी./16 कि.मी. अंतर चार तासात पुर्ण करण्याची शारीरिक क्षमता चाचणी पात्रतेच्या अधिन राहून ) व शारीरिक क्षमता चाचणी करीता कार्यक्रम प्रसिध्द करणे. | 03/12/2016 |
| 9 | निवड झालेल्या उमेदवारांची चार तासात 25 कि.मी./16 कि.मी. अंतर पुर्ण करण्याची शारीरिक क्षमता चाचणी घेणे. | 10/12/2016 ते 11/12/2016 |
| 10 | चार तासात 25 कि.मी./16 कि.मी. अंतर पुर्ण करण्याच्या शारीरिक क्षमता चाचणीमध्ये पात्र ठरलेल्या निवड यादीतील उमेदवारास वैद्यकीय तपासणी प्रमाणपत्र सादर करण्यास कळविणे तसेच सक्षम वैद्यकीय अधिकारी यांचेकडून वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र प्राप्त करणे. | 12/12/2016 ते 26/12/2016 |
| 11 | वैद्यकीय तपासणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर सक्षम प्राधिकारी यांनी उमेदवारांना वनरक्षक पदावरी नियुक्तीचे आदेश देणे. | 30/12/2016 |

Scanned by CamScanner

## 7.00 निवड प्रक्रियाबाबत सूचना

7.01 शारिरिक पात्रता तपासणीचे व शारिरिक क्षमता चाचणीचे स्थळ आणि वेळ याबाबत सूचना वेळोवळी http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर देण्यात येईल

निवड प्रक्रियेच्या वेळापत्रकात काही बदल झाल्यास, याबाबत सूचना वेळोवेळी http://maharecruitment.mahaonline.gov.in व www.mahaforest.nic.in या संकेतस्थळावर देण्यात येईल.

(टिपखालील:- माहिती http://maharecruitment.mahaonline.gov.in व www.mahaforest.nic.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द केली जाईल. याबाबत वेगळयाने पत्रव्यवहार केला जाणार नाही(.

7.02 उमेदवार हा शारिरीक क्षमता चाचणीकरीता शारिरीक दृष्टया सुदृढ असल्या बाबतचे प्रमाणपत्र संबंधीत उमेदवारांनी शासकीय वैद्यकीय अधिकारी यांचेकडून प्राप्त करुन घेवून धावण्याच्या चाळणी परिक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

7.03 पुरुष उमेदवारांकरिता 5 कि.मी. व स्त्री उमेदवारांकरिता 3 कि.मी. धावण्याच्या कार्यक्रमाचे नियोजन या वनवृत्तातील विभागीय स्तरावर आयोजित केले जाईल. याबाबतची माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल.

7.04 उमेदवाराचे धावण्याच्या चाचणीतील वेळ व चालण्याच्या चाचणीनंतर पात्र / अपात्र उमेदवारांची यादी व इतर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येणाऱ्या भरती प्रक्रियेबाबतच्या सूचना http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द केली जाईलयाबाबत. वेगळयाने पत्रव्यवहार केला जाणार नाही.

## 8.00 सर्वसाधारण अटी :-

8.1. सेवाप्रवेश नियमातील अटींनुसार संबंधित संवर्गातील उमेदवारांना मराठी भाषा वाचता, लिहीता व बोलता येणे आवश्यक आहे.

8.2 उमेदवार महाराष्ट्र राज्याचा कायमचा रहिवासी असावा.

8.3 महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक -भुकंप-1009/ प्र.क्र.207/2009/16-अ,दिनांक 27/08/2009 अन्वये प्रकल्पग्रस्तांना असलेले 5% समांतर आरक्षण त्यांचेसाठीच राखून ठेवून आरक्षणांतर्गत भुकंपग्रस्तांसाठी ठेवलेले आरक्षण काढून भुकंपग्रस्तांसाठी स्वतंत्रपणे 2% समांतर आरक्षण लागू राहील.

8.4 महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-1097/ प्र.क्र.31/981/13-अ दिनांक 16/3/1999 अन्वये समांतर आरक्षण हे कप्पीकृत आरक्षण असल्याने सामाजिक आरक्षणाचा प्रत्येक प्रवर्गामध्ये (उभे आरक्षण जसे अ.जा.,अ.ज., वि.ज.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र., इ.मा.व. आणि इतर प्रवर्ग) विशेष आरक्षणानुसार होणा-या राखीव पदाची संख्या पदाच्या तपशिल या शिर्षातंर्गत दर्शविण्यात आलेला आहे. समांतर आरक्षणाचे उमेदवार उपलब्ध न झाल्यास सर्व समांतर पदे त्या त्या सामाजिक प्रवर्गातुन भरण्यात येईल.

8.5 वि.जा.(अ), भ.ज. (ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), विमाप्र व इमाव या प्रवर्गातील उमेदवारासाठी शासन परिपत्रक सामाजिक न्याय, सांस्कृतीक कार्य व विशेष सहाय्य विभाग क्र.सी.बी.सी-10/2006/प्र.क्र.15/मावक-5, दि. 30/6/2006 सोबतच्या सुधारित नमुन्यात त्यांची जात उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) निकटतम वर्षाचे कालावधीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. सदर सुधारित

Scanned by CamScanner

प्रमाणपत्र धावण्याच्या चाळणी चाचणीनंतर पात्र ठरल्यानंतर होणा-या कागदपत्रांची तपासणी करतेवेळी सादर करणे आवश्यक आहे. सदर दिवशी प्रमाणपत्र नसल्यास उमेदवाराचा पुढील चाचणीसाठी विचार केला जाणार नाही.

खुल्या प्रवर्गातील व मागासप्रवर्गातील इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील महिलासाठी असलेले 30 टक्के आरक्षण उन्नत व प्रगत व्यक्ति / गटातील (क्रिमीलेअर) कुटूंबातील महिला सदस्यांना अनुज्ञेय राहणार नाही.

8.6 महिला आरक्षणा करीता अर्ज करतांना खुल्या प्रवर्गातील व मागास प्रवर्गातील इतर मागास वर्ग, भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील महिला उमेदवारानी त्यांची जात उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) निकटतम वर्षाचे कालावधीचे सक्षम प्राधिका-यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

8.7 रोजगार कार्यालय, जिल्हा समाज कल्याण कार्यालय, सैनिक कल्याण कार्यालय इत्यादी कार्यालयाकडे नोंदणीकृत असलेल्या उमेदवारांनी देखील ऑनलाईन अर्ज सादर करावा.

8.8 वनविभागात कार्यरत असलेल्या सर्व अधिसंख्य वनमजूरानी ते ज्या पदाची पात्रता धारण करीत आहेत त्या पदाकरिता विहित केलेल्या पध्दती प्रमाणे ऑन लाईन अर्ज सादर करावा.

8.9 पडताळणी अंती अर्ज रद्द ठरविणे, निवड प्रक्रियेत वेळेवर बदल करणे, उमेदवारांची अंतिम निवड करणे, जाहिरातीचे अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करणे या बाबतचे संपुर्ण अधिकार निवड समितीने राखुन ठेवले आहे.

8.10 सेवाशर्तीनुसार अपात्र ठरलेल्या उमेदवारांना भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर वगळण्यात येईल.

8.11 उमेदवारांना धावण्याची चाळणी चाचणी व शारिरीक क्षमता चाचणी करिता कोणत्याही प्रकारचा भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

8.12 वनविभागातील वनरक्षक या पदावर नियुक्ती करतांना एकुण 5 % पदे होमगार्डस मध्ये कमीत कमी 3 वर्ष इतकी सेवा झालेल्या व वनरक्षक पदासाठी आवश्यक शैक्षणिक / शारिरीक पात्रता पुर्ण करणा-या विहित वयोमर्यादेतील तसेच विहित पात्रता परीक्षा उत्तीर्ण होणा-या होमगार्डस मधून भरण्यात येतील.

8.13 सुशिक्षीत बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये 3 वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर/पदवीकाधारक अंशकालीन उमेदवारांना शासकीय / निमशासकीय सेवेतील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट-क पदावरील सरळसेवेने करावयाच्या नियुक्तीसाठी 10% समांतर आरक्षण लागू करण्यात येत आहे व त्यांना सध्याच्या 45 वर्षे मर्यादेत आणखी 1 वर्षाने वाढ करुन सदर सवलत 46 वर्षापर्यंत देण्यात येईल.

8.14 उमेदवारांना ओळखपत्र,लहान कुटूंबासंबंधी प्रमाणपत्र (नमुना-अ), बचनपत्राचा नमुना व उमेदवारांनी स्वाक्षरी करावयाचे प्रतिज्ञापत्राचे नमुने www.maharecruitment.mahaonline.gov.in व www.mahaforest.nic.in या संकेतस्थळावरून प्राप्त करून घ्यावे.

Scanned by CamScanner

8.15 विहित वयोमर्यादेतील शासकीय /निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालयीन प्रमुखांच्या परवानगीने भरावेत.

8.16 भरती बाबत कोणतीही न्यायालयीन प्रक्रिया सुरू झालेस याबाबत न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहून सदर पदे भरणेची कार्यवाही करणेत येईल.

**9.00 सेवाशुल्क :-**

उमेदवाराने उपरोक्त पदासाठी आवश्यक असलेले शुल्क खालीलप्रमाणे महाऑनलाईन या संस्थेच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे दिलेल्या पध्दतीने जवळच्या भारतीय स्टेट बँक शाखेमध्ये भरणा करणे आवश्यक आहे.

| प्रवर्ग | शुल्क रुपये |
|---|---|
| खुला | 300/- |
| मागासवर्गीय | 150/- |
| माजी सैनिक | नाही. |

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक आरटीए-1079/0/482/16-अ, दिनांक 3 जुलै, 1980 मधील परिच्छेद क्रमांक 2 मध्ये माजी सैनिकांना परिक्षा फी तसेच अर्जाचे फी मधून सुट दिलेली आहे.

**10.00 ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मार्गदर्शक सुचना :-**

| अ.क्र. | कार्यक्रम | दिनांक | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| 1. | अर्ज ऑनलाईन नोंदणी (रजिस्ट्रेशन) करण्याचा कालावधी | 26/09/2016 | 19/10/2016 |
| 2. | संगणकीय चलनाव्दारे स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) यांच्या शाखामध्ये फि स्विकृतीचा कालावधी | 27/09/2016 | 20/10/2016 |
| 3. | ज्या उमेदवाराने बँकेमध्ये दिनांक 20/10/2016 पर्यंत भरती प्रक्रिया शुल्क जमा केले असेल त्याच्यासाठी उर्वरित ऑनलाईन अर्ज भरण्याचा कालावधी | 21/10/2016 | |

**11.0 ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याची सर्वसाधारण प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.**

अ) प्रोफाईल निर्मिती / प्रोफाईल अद्ययावत करणे.

आ) अर्ज सादरीकरण

इ) शुल्क भरणा

**11.1 प्रोफाईल निर्मिती / प्रोफाईल अद्ययावत करणे.**

1. http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर वापरकर्त्याने प्रोफाईल निर्मिती करण्याकरीता नवीन वापरकर्त्याची नोंदणी वर क्लिक केल्यानंतर यंत्रणा लॉग-इन पृष्ठ प्रदर्शित करेल. नवीन खाते (वापरकर्त्याचे नांव Login व Password) निर्माण करण्यासाठी लॉग-इन पृष्ठाव्दारे विचारलेली सर्व माहिती भरुन नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करावी.
2. प्रोफाईलव्दारे माहिती भरताना उमेदवाराने स्वत:चाच ई मेल आयडी, मोबाईल क्रमांक व जन्मदिनांक नोंदविणे आवश्यक आहे.
3. उमेदवारांकडे नित्य वापरात असेल असा ई मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक असणे आवश्यक आहे. तसेच भरती प्रक्रिये दरम्यान पत्रव्यवहार, प्रवेशपत्र आणि इतर माहिती ऑनलाईन देण्यात येणार असल्याकारणामुळे भरती प्रक्रियेच्या संपूर्ण कालावधीमध्ये नोंदणीकृत सदर ई मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक वैध / कार्यरत राहणे आवश्यक आहे.

Scanned by CamScanner

4. वरीलप्रमाणे प्रोफाईलची निर्मिती झाल्यानंतर वापरकर्त्याने स्वत:च्या Login व Password व्दारे प्रवेश करुन प्रोफाईलमध्ये विचारलेली वैयक्तिक माहिती, संपर्क तपशील, इतर माहिती, शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी संदर्भातील तपशीलाची अचूक नोंद करावी.
5. फोटो व स्वाक्षरी अपलोड करणे :-
नोंदणीची प्रक्रिया व प्रोफाईलव्दारे विचारलेली माहिती भरुन झाल्यानंतर उमेदवाराने स्वत:चे छायाचित्र / फोटो (रुंदी 3.5 सें.मी. X उंची 4.5 सें.मी.) व स्वत:ची स्वाक्षरी स्कॅन करुन खालीलप्रमाणे अपलोड करावी :
अ) एका पांढ-या स्वच्छ कागदावर विहीत आकाराचा फोटो चिकटवावा. फोटोवर स्वाक्षरी करु नये अथवा फोटो साक्षांकित करु नये. वरील सुचनांनुसार फोटो कागदावर व्यवस्थित चिकटवावा, स्टॅपल अथवा पिनिंग करु नये. फक्त स्कॅनरवर ठेवून स्कॅन करता येईल.
आ) फोटोचा आकार खालीलप्रमाणे असणे गरजेचे आहे.




इ) छायाचित्र अर्जाच्या दिनांकाच्या सहा महिन्याहून आधी काढलेले नसावे आणि ते ऑनलाईन परि क्षेच्या वेळी उमेदवाराच्या रुपाशी जुळणारे असावे.
ई) विहीत आकार / क्षमतेप्रमाणे काळ्या किंवा निळ्या शाईच्या पेनने स्वच्छ कागदावर स्वाक्षरी करावी.
उ) उमेदवारने स्वत: स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. अन्य कोणत्याही व्यक्तीने स्वाक्षरी केल्यास ती ग्राह्य धरण्यात येणार नाही.
ऊ) वरीलप्रमाणे विहीत आकारातील फक्त फोटो व स्वाक्षरी वेगवेगळी स्कॅन करावी. संपूर्ण पृष्ठ अथवा फोटो व स्वाक्षरी एकत्रित स्कॅन करु नये.
ऋ) फोटो व स्वाक्षरीची प्रत्येकाची संपूर्ण इमेज स्कॅन करुन jpj फॉरमॅटमध्ये संगणकावर वेगवेगळया फाईल्समध्ये स्वतंत्रपणे जतन (save) करावी. फोटो, तसेच स्वाक्षरी ईमेज प्रत्येकी ५० के.बी. पेक्षा जास्त असता कामा नये. यापेक्षा जास्त क्षमतेची इमेज प्रणालीवर स्वीकारली जात नाही. इमेजची साईझ ५० के.बी. पेक्षा जास्त असल्यास स्कॅनरचे dpi resolution , No. of colours, etc. व्दारे स्कॅनिंगच्या वेळी setting adjust करावी.
ऌ) स्कॅन करुन अपलोड केलेली स्वाक्षरी, प्रवेशपत्र तत्सम कारणासाठी वापरण्यात येईल. परीक्षेच्या वेळी प्रत्यक्ष कागदपत्रे तपासणीचे वेळी व अन्य कोणत्याही वेळी अर्ज भरताना केलेली स्वाक्षरी व फोटो न जुळल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल, अथवा अन्य कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

## 11.2 अर्ज सादरीकरण

1. http://maharecruitment.mahaonlie.gov.in या संकेतस्थळावरवापरकर्त्यांनी स्वत:च्या युजर आयडी व पासवर्डव्दारे यशस्वीरित्या प्रवेश (login) केल्यानंतर " ऑनलाईन अर्ज " येथे क्लिक करावे. जाहिरातीव्दारे प्रसिध्द केलेल्या पदाबाबतची यादी या ठिकाणी उपलब्ध होईल.
2. ज्या पदासाठी अर्ज करावयाचा असेल त्या जाहिरातीच्या उजवीकडे असलेल्या "अर्ज करण्यासाठी येथे क्लिक करा" या ठिकाणी क्लिक करावे.
3. उमेदवारांच्या प्रोफाईलच्या आधारे यंत्रणा वैधता तपासेल. वापरकर्ता जाहिरातीतील निकष पूर्ण करीत असल्यास वापरकर्त्याला अर्ज सादर करता येईल.

Scanned by CamScanner

4. जाहिरातीमध्ये नमूद केलेले निकष वापरकर्ता पूर्ण करीत नसल्यास माहिती संग्रहित होऊ शकत नाही, असा संदेश यंत्रणा प्रदर्शित करेल. अर्ज यशस्वीरित्या सादर झाल्यानंतर तुमचा अर्ज यशस्वीरित्या जतन झाला, असा संदेश यंत्रणा प्रदर्शित करेल.
5. रक्कम भरा या पर्यायावर क्लिक करुन अर्जदाराला क्रेडिट कार्ड/डेबीट कार्ड/ नेट बँकिंग (35+ बँका) व्दारे भरणा करता येईल. अथवा अर्जदार ऑनलाईन अर्ज सादर करुन भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे शुल्काचा भरणा करण्याचा पर्याय स्वीकारु शकेल.

**11.3 शुल्क भरणा**

यशस्वीरित्या अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता खाली नमूद केलेल्या पध्दतीचा अवलंब करावा.

1. शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील "माझे खाते" या लिंक वर क्लिक करावे.
2. "माझे खाते" या लिंक वर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या कार्यालयाचे नाव निवडल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदाची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर "Unpaid" असे लिहीलेले असेल, त्या ठिकाणी "Pay Now" अशी लिंक उपलब्ध असेल.
3. "Pay Now" या लिंक वर क्लिक केल्यानंतर दोन पर्याय उपलब्ध होतील.
   (अ) ऑनलाईन पेमेंट, (ब) चलनाव्दारे.
4. क्रेडीट कार्ड, डेबीट कार्ड अथवा नेट बँकींगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करता येईल.
5. ज्या उमेदवारांना इंटरनेट व्दारे स्वत: अर्ज भरावयाचा नसेल, असे उमेदवार महा ई-सेवा केंद्रामार्फत आपला अर्ज करु शकतात. त्याच वेळी उमेदवाराकडून परिक्षा शुल्क व सेवा केंद्राचे शुल्क घेतले जाईल. उमेदवारांना पैसे भरण्याची पावती महा ई-सेवा केंद्रा तर्फे देण्यात येईल. या सुविधेमध्ये आवेदन अर्ज भरल्यानंतर पैसे भरल्याची पावती देणे, याचा समावेश असेल. फोटो / स्वाक्षरी स्कॅन किंवा अर्जाच्या प्रिंट करीता स्वतंत्र रक्कम केंद्र चालकाकडून आकारली जाईल.
6. चलनाव्दारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.
7. भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे शुल्क भरावयाचा पर्याय नि वडल्यास अर्ज सादर केल्याच्या दोन तासांनंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर केल्यास त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक राहील.
8. चलनाव्दारे शुल्क स्विकारण्याकरीता भारतीय स्टेट बँक उमेदवाराकडून परीक्षा शुल्क व्यतिरिक्त नियमानुसार सेवा शुल्क आकारेल. अशाप्रकारे उमेदवारास चलनाव्दारे शुल्क भरताना परीक्षा शुल्क + बँकेचे सेवा शुल्क भरावे लागतील.

**सर्वसाधारण सुचना -**

1. नोंदणी व अर्ज भरण्याची प्रक्रिया उमेदवाराने स्वत:च करणे आवश्यक आहे.
2. संगणक प्रक्रियेकरिता अर्ज इंग्रजीमध्ये भरणे आवश्यक आहे. अर्जातील संपूर्ण माहिती CAPITAL LETTERS मध्ये भरावी. संक्षिप्तपणे (Abbreviation) वा आद्याक्षरे (Initials) न देता संपूर्ण नांव व संपूर्ण पत्ता नमूद करावा. नावाच्या / पत्त्याच्या दोन भागांमध्ये एका स्पेसने जागा सोडावी.
3. महिला उमेदवारांनी पूर्वाश्रमीच्या (By Birth) नावाने अर्ज करणे आवश्यक आहे.
4. एस.एस.सी. अथवा तत्सम प्रमाणपत्रावरील नावाप्रमाणे अर्ज भरावे. त्यानंतर नांव बदलले असल्यास अथवा प्रमाणपत्रातील नावांत कोणत्याही प्रकारचा बदल झाला असल्यास, त्यासंबंधीच्या बदलासंदर्भातील राजपत्राची प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करावी.

Scanned by CamScanner

5. पत्रव्यवहाराचा स्वत:चा पत्ता इंग्रजीमध्ये लिहावा. व्यवसायिक मार्गदर्शक केंद्राचा / संस्थेचा पत्ता पत्रव्यवहारासाठी देवू नये.
6. अर्जामध्ये केलेला दावा व कागदपत्रे तपासणीचे वेळी सादर केलेल्या सारांशपत्रातील अथवा सादर केलेल्या कागउपत्रांतील दावा यामध्ये फरक आढळून आल्यास अर्जामधील माहिती अधिकृत समजण्यात येईल. अर्जामधील माहिती संदर्भातील कागदोपत्री पुरावे सादर करु न शकल्याने /मिळाल्याने उमेदवारी रद्द होवू शकते.
7. संबंधित पदाच्या / परीक्षेच्या जाहिरात / अधिसूचनेमध्ये दिलेल्या सर्व सूचनांचे काळजीपूर्वक अवलोकन करुनच अर्ज सादर करावा. अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारेच पात्रता आजमावली जाईल व त्याच्या आधारे निवड प्रक्रिया पूर्ण होईल.
8. एकाहून अधिक सेवेच्या / पदाच्या अथवा इतर परीक्षा अथवा मुलाखती एकाच दिवशी असल्यास याबाबत विचारपूर्वक निर्णय घेणे आवश्यक आहे. परीक्षेचा दिनांक, वेळ, केंद्र यामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही परिस्थितीत मान्य करण्यात येणार नाही. तसेच भरलेल्या शुल्काचा परतावा देखील करता येणार नाही.

**वरील कार्यपध्दती ही अर्ज करण्याची योग्य पध्दत आहे, याशिवाय दुस-या पध्दतीने केलेले अर्ज हे अवैध ठरविण्यात येतील.**

**12.00 महत्वाची सुचना -:**

1) पोस्टाने अथवा इतर कोणत्याही प्रकारे आलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जाची प्रत या कार्यालयास समक्ष अथवा पोस्टाने पाठवू नये.तसेच यापूर्वी महामंडळाकडे नोकरीकरीता केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

2) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणिक प्रमाणपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापी ऑनलाईन अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही त्रुटी राहिल्यास अर्ज संगणकाव्दारे स्वीकारला जाणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी अर्ज भरण्याची दक्षता घ्यावी.

3) राज्य शासनाच्या कोणत्याही सेवायोजन कार्यालयात नोंदणी केली असली तरी (उदा. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र) वरील पदासाठी विहीत नमुन्यात ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.

4) एकदा ऑनलाईन सादर केल्यानंतर त्यात कोणत्याही प्रकारे बदल करता येणार नाही याची उमेदवाराने नोंद घ्यावी. त्यासाठी अर्ज करतेवेळी उमेदवाराने आवश्यक सर्व तपशील स्वत: जवळ तयार ठेवावा व अर्ज योग्य पध्दतीने भरला आहे याची खात्री करावी.

5) उमेदवाराने अर्ज करण्यापूर्वी तो संबंधित पदाची अर्हता पुर्ण करतो की नाही याची खात्री करावी. भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज अपात्र ठरला तर उमेदवाराने भरलेली भरती प्रक्रिया शुल्काची रक्कम परत केली जाणार नाही. तसेच इतर कोणत्याही कारणास्तव भरती प्रक्रिया शुल्क परत केले जाणार नाही. उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तीची व्यवस्था केल्याचे आढळल्यास किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती दिल्याचे तसेच प्रमाणपत्रे/कागदपत्रे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची/तिची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

Scanned by CamScanner